Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

शेतकरी कामगार पक्ष ध्येयधोरणे आणि वाटचाल

विवेकानंद माने
इतिहास विभाग प्रमुख, क्रांतिअग्रणी जी.डी.बापू लाड महाविद्यालय, कुंडल जि. सांगली.

प्रस्तावना

कोणत्याही देशातील शासन व्यवस्थेत राजकीय पक्षांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. राजकीय पक्षाने घेतलेल्या भूमिकेवरच त्या देशातील लोकशाहीचे भवितव्य अवलंबून असते. जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून भारत ओळखला जातो. त्यामुळे भारतातील राजकीय पक्षांची भूमिका महत्त्वाची ठरताना दिसते. स्वातंत्र्यापासून भारतीय लोकशाहीच्या वाटचालीत मानवी समाजाच्या विकासाच्या दृष्टीने काही चांगल्या गोष्टी घडून आल्या असल्या तरी काही आव्हाने किंवा समस्यासुद्धा उभ्या राहिल्या आहेत. भारतात काही राष्ट्रीय पक्ष, काही प्रादेशिक पक्ष तर काही स्थानिक पक्ष कार्यरत असलेले दिसतात. आज भारतीय लोकशाही समोर भ्रष्टाचार, हिंसाचार, बेकारी, उपासमार, समानता व स्त्री शिक्षण यासारखी अनेक आव्हाने उभी आहेत. या लोकशाहीच्या अपयशाला बहुतांश राजकीय पक्षांचा स्वार्थी दृष्टीकोण कारणीभूत असलेला दिसून येतो. असे असले तरी स्वहित बाजूला सारून जनहितासाठी प्रामाणिकपणे कार्य करणारे काही पक्ष आजही कार्यरत आहेत. यामध्ये शेतकरी कामगार पक्षाचा क्रमांक वरचा लागतो.

काँग्रेस पक्षांतर्गत गट—तट:

स्वातंत्र्यपूर्वकाळात महाराष्ट्रातील काँग्रेस पक्षात तीन गट कार्यरत होते. १) उजवा गट किंवा गांधीवादी गट शंकरराव देव यांच्या नेतृत्वाखाली ब्राह्मण, मारवाडी, गुजराती या पांढरपेशी वर्गाच्या प्रभाव अंतर्गत होता. २) दुसरा डावा गट काकासाहेब गाडगीळ व केशवराव जेधे यांच्या नेतृत्वाखाली ब्राह्मणेतर शेतकरी—शेतमजूर व कामगारांचे नेतृत्व करणारा होता. ३) तिसरा रॉयवादी गट जो अतिजहाल समाजवादी विचारांच्या प्रभावाखाली होता.[१] या सर्व गटासह काँग्रेस कार्यरत होती. १९३७ ते १९३९ या काळातील बाळासाहेब खेर यांच्या मंत्रिमंडळाचा कारभार शेतकरी—कामगार पेक्षा भांडवलदारांच्या जास्त जवळचा होता. १९४६ च्या मंत्रिमंडळाची रचना करताना ब्राह्मणेतर वर्गाचे जेधे गाडगीळ यांना विचारातच घेतले नाही. याही मंत्रिमंडळाचा कारभार नोकरशहा व भांडवलदार वर्गाकडे झुकणारा होता. यातूनच शेतकरी कामगार पक्षाच्या (शेकाप) उदयाची वाटचाल सुरू झाली.

शेकाप पक्षाचा उदय:

काँग्रेसचे भांडवलदार धार्जिणे धोरण व त्यामुळे सर्वसामान्य जनतेचे हाल वाढले होते. यामुळे जनतेची सहानभूती असणाऱ्या आमदारांनी जुलै १९४७ मध्ये बाबुराव सनस यांच्या बंगल्यावर मिटिंग घेऊन शेतकरी व कामगारांच्या विकासासाठी काँग्रेसवर दबाव आणण्याचे ठरवले. ११ सप्टेंबर १९४७

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

रोजी डाव्यांची दुसरी बैठक पुण्यातील स्वस्तिक बंगल्यावर झाली. या बैठकीस काँग्रेस अंतर्गत शेतकरी कामगार संघ स्थापन करण्याचा ठराव करण्यात आला. शेतकरी व कामगारांच्या राज्य स्थापनेसाठी जास्तीत जास्त संघटन करणे व ही संघटना व्यवस्थित कार्यरत राहण्यासाठी घटना तयार करणे गरजेचे होते. त्याची जबाबदारी शंकरराव मोरे, रामभाऊ नलावडे, बॅरिस्टर मोरे, यशवंतराव चव्हाण यांच्यावर सोपवली. मात्र यातून यशवंतराव चव्हाणांनी ऐनवेळी माघार घेऊन के. डी. पाटील यांचे नाव सुचविले.[२] मात्र संघटनेची घटना तयार न झाल्यामुळे भाऊसाहेब राऊतांनी तळमळीच्या निवडक कार्यकर्त्यांची बैठक आपल्या घरी ११ जानेवारी १९४७ रोजी बोलावली. या बैठकीची पत्रिका शंकरराव मोरे यांनी काढली होती. त्या पत्रिकेत ते म्हणतात ''देशात ब्रिटिशांच्या हातून मिळणारी सत्ता शेतकरी आणि कामगारांच्या श्रमावर ऐतोबाप्रमाणे जगणाऱ्या भांडवलशाहीच्या हातात जाऊ नये म्हणून संघटित प्रयत्न करणे फार अगत्याचे आहे. त्यादृष्टीने बहुजन समाजासाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी एकत्र येऊन विचारविनिमय करणे जरुरी आहे.'' म्हणजेच एका स्वतंत्र पक्षाची गरज यावेळी व्यक्त केली जो शेतकरी कामगार पक्ष म्हणून काँग्रेस अंतर्गत काम करणार होता. या ठरावास यशवंतराव चव्हाण व सोनुसिंग पाटील यांनी विरोध केला. तरीही सभेचे अध्यक्ष राम नलावडे यांच्या अध्यक्षतेखाली व ७५ कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत ठराव पास केला.[३]

शेकापचा काँग्रेस अंतर्गत राहून दबावतंत्र आणि बहुजन समाजाचा विकास करण्याचा एकमेव उद्देश होता. मात्र काँग्रेसचे भांडवलदार प्रिय धोरण म्हणजे भक्षक व रक्षक यांना एकाच वेळी पोसण्याचे होते. दरम्यान काँग्रेसच्या बलदेव सिंग यांनी एक पक्ष, एक नेता, एक कार्यक्रम याची घोषणा केली. यातून काँग्रेसच्या हुकूमशाहीची चाहूल घेऊन अशा एकाधिकारी पक्षाला सक्षम विरोध झाला नाही तर लोकशाही धोक्यात येईल. त्यामुळे जनतेची बाजू मांडण्यासाठी विरोधी पक्षाची गरज होती. यासाठी समाजवादावर प्रचंड विश्वास असलेल्या व ज्यांची ध्येयधोरणे निश्चित आहेत अशा कार्यकर्त्यांची बैठक भाऊसाहेब राऊत व शंकरराव मोरे २—३ ऑगस्ट १९४७ रोजी आळंदी येथे बोलावली. या बैठकीत शेकाप या उपपक्षाची स्थापना करण्यात आली. या उपपक्षाला बहुजन समाजातील लोकांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. काँग्रेसमध्ये राहून काँग्रेसवरच टीका करणे नेतृत्वाला आवडले नाही. त्यांनी काँग्रेस अंतर्गत कोणत्याही उपपक्षाचे अस्तित्व मान्य करण्यास नकार देऊन ज्यांना पक्षाची ध्येयधोरणे मान्य नसतील त्यांनी बाहेर पडावे असा स्पष्ट इशाराच दिला. शेवटी काँग्रेसमधून बाहेर पडण्याचा निर्णय घेण्यासाठी २६ एप्रिल १९४८ रोजी भाऊसाहेब राऊत यांच्या घरी सुमारे दीडशे कार्यकर्त्यांची सभा झाली. त्यावेळी केशवराव जेधे, नाना पाटील, भाऊराव पाटील यांच्यासह सर्व आमदारांनी सभा घेऊन काँग्रेसमधून बाहेर बाहेर पडण्याचा ठराव बहुमताने पास केला.[४] काँग्रेस सोडण्याचा निर्णय घेतल्यानंतर १३ जून १९४८ रोजी पक्षाच्या घटनेत योग्य तो बदल करून शेतकरी कामगार पक्षाची स्थापना केली. पक्षाचे पूर्णवेळ कार्यकर्ते नेमून त्यासाठी खर्चाची तरतूद केली गेली. वर्षाच्या खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करण्यात आले. शेतकरी कामगार संघाचा कार्यक्रम स्वीकारून सत्तारूढ होऊन तो राबविण्याची संधी मिळेपर्यंत कार्यकर्त्यांनी शिक्षण, आरोग्य, सहकारी संस्था, शेती लघुउद्योग व प्रचार वगैरे क्षेत्रात शेतकरी व कामगार यांच्याशी समरस होऊन क्रांतिकारक हेतूने विधायक कार्यक्रम हाती घ्यावेत यासंबंधी ठराव पास करण्यात आला.[५]

प्रारंभी मार्क्सवादाचा स्वीकार:

मार्क्सवादाचे पडसाद शेकापच्या निर्मितीच्या प्राथमिक अवस्थेपासून उमटलेले दिसून येतात. ११ सप्टेंबर १९४६ रोजी पुणे येथे झालेल्या शेतकरी कामगार संघटनेच्या स्थापना ठरावात 'विशेषत: शेतकरी—कामगार राज्य स्थापन करण्याच्या काँग्रेसच्या घोषणेस शक्य तितक्या लवकर मूर्त स्वरूप देण्यासाठी संघटित शक्ती निर्माण करणे जरुरीचे असल्याने या संघाची स्थापना करण्यात येत आहे.' असे म्हटले होते.[६] यावेळी या पक्षापुढे तीन पर्याय होते.

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

१) लेनिन, माओ—त्से—तुंग व कॅस्ट्रो यांच्या पद्धतीने कामगार—किसानांचे संघटन करून सशस्त्र मार्गाने क्रांती घडवून आणणे.

२) संसदीय मार्गांचा अवलंब करून जनतेच्या चळवळीला आक्रमकरित्या संघटित करून मतपेटीच्या द्वारा सत्तांतर घडवून आणणे.

३) हिंसक प्रतिकार व संसदीय राजकारण न करता व्यवस्थेच्या बाहेर राहून जनसमूहाच्या संघटन करणे, जनसमूहांची या चळवळीच्या द्वारा ताकद वाढवून समाजजीवनावर त्यांचे प्रभुत्व निर्माण करणे.[७]

अशा प्रकारे शेकापने प्रारंभी मार्क्सवादाचा स्वीकार करून आपली वाटचाल सुरू केली होती.

दाभाडी प्रबंध:

स्वतंत्रपणे पक्षाची स्थापना झाल्यानंतर शेकापचे दुसरे अधिवेशन मे १९५० मध्ये नाशिक जिल्ह्यातील दाभाडी येथे भरले. या अधिवेशनात शेकापने मार्क्सवाद व लेनिनवादाचा स्पष्टपणे अंगीकार केला. दाभाडी येथे झालेल्या ठरावाचा पक्षाच्या विचारांची वैचारिक मांडणी करण्यात आली होती. म्हणून या ठरावाला दाभाडी प्रबंध असे म्हणतात. शेकापच्या नेत्यांनी आळंदी येथील बैठकीपासूनच मार्क्सवाद व लेनिनवाद यांच्या वाटेवरून चालण्याचा मनोदय व्यक्त केला होता. दाभाडी प्रबंधात त्याला फक्त शब्दबद्ध करण्यात आले.

दाभाडी प्रबंध स्वीकारल्यामुळे शेकापने नवे वळण घेतले. मार्क्सवाद स्वीकारून कम्युनिस्ट इंटरनॅशनलचे मार्गदर्शन मान्य करण्याचे ठरले. शेतकऱ्यांची क्रांती घडवून आणण्यास निघालेला पक्ष म्हणून चिनी कम्युनिस्ट पक्षानेही शेकापची माहिती घेतली होती.[८] या प्रबंधामध्ये आंतरराष्ट्रीय—राष्ट्रीय परिस्थिती, हिंदी कम्युनिस्ट पक्षाच्या चुका, शेकाप पक्षाचा जन्म व कार्य, समाजवादी पक्षाचे स्वरूप व पक्षाची पुढील वाटचाल याविषयी सविस्तर ऊहापोह करण्यात आला आहे.

शेकापची ध्येयधोरणे:

सन १९५० मध्ये शेकापने दाभाडीचा ठराव प्रभाव टाकून आपली ध्येयधोरणे शेगाव, नाशिक रोड व मोमिनाबादच्या ठरावात नमूद केली होती. ही ध्येयधोरणे मार्क्सवादावर आधारित होती. अशाप्रकारे लोकशाही क्रांती घडवून आणण्यासाठी शेकापने आपली पुढील ध्येय धोरणे निश्चित केली होती.

१) काँग्रेसच्या राजवटीत जनतेच्या खालच्या थरातील लोकांवर मोठ्या प्रमाणात अन्याय होत आहेत. कारण सरकार वरच्या थरातील लोकांच्या हितरक्षणासाठी राज्य चालविते. म्हणून या अन्यायाविरुद्ध उभे राहून जनतेने असंतोष संघटित करणे आवश्यक आहे.[९]

२) सध्याचे राजकारणामध्ये लोकप्रतिनिधींच्या लोकसभांत प्रवेश करून आपले प्रतिनिधित्व सिद्ध करणे गरजेचे आहे. राज्यसंस्था या समाजजीवनाच्या जडणघडणीत महत्त्वाची भूमिका पार पाडत आहेत. परंतु राज्यसंस्था भांडवलदार वर्गाच्या हातातील हत्यार आहेत. असे असले तरी जनतेत एकजूट निर्माण करून चळवळीच्या द्वारा लोकशाहीच्या मार्गाने निवडणूक जिंकता येते व सत्तांतर करता येते हाच वैधानिक राजकारणाचा आशय आहे.[१०]

३) भांडवलदार, भ्रष्ट राज्यकर्ते व प्रतिगामी शक्ती यांच्या काळजात धडक बसेल अशी जनतेची ताकद लढाऊ चळवळींद्वारा उभी करणे आवश्यक आहे.

४) वेगवेगळ्या प्रश्नावर जनसमूहाला संघटित करून त्यांचे लढे उभारणे व सरकारवर जनसमूहाच्या चळवळीचे दडपण आणून त्यास चुकीच्या धोरणात सुधारणा करावयास भाग पाडणे गरजेचे आहे.

५) श्रमजीवी जनतेच्या संघटनांचे क्षेत्र सामाजिक, राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक क्षेत्रात विस्तारित करून, एकांगीपणा टाकून सर्वांच्या दु:खात सहभागी होऊन आपणास जनतेत एकजूट निर्माण करता येईल. ग्रामीण भागात संख्येने कमी पण आर्थिकदृष्ट्या सधन वर्गाचे वर्चस्व मोडीत काढले पाहिजे.

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

कामगार, शेतकरी व मध्यमवर्ग यांना संघर्षप्रवण करून त्यास सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक क्षेत्रात पुरोगामी भूमिका स्वीकारण्यास उद्युक्त करणे गरजेचे आहे.[११]

६) शेतजमीन धारणेची कमाल मर्यादा घालणे. याचा अर्थ एक कुटुंब कसू शकेल एवढी जमीन धारणा असावी. कोरडवाहू जमिनीची कमाल मर्यादा ५४ एकर असावी असा होतो. तसेच शेतकऱ्यांच्या मालाला किफायतशीर किंमत मिळवून देणे.

७) शेतकरी व कामगार यांचे प्रश्न सोडविण्याचा जोरदार प्रयत्न करणे. शेतमजुरांच्या स्वतंत्र संघटना करुन त्यांचे प्रश्न सोडविणे. सहकारी शेतीचे उद्दिष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे.

८) रोजगार हमी योजना सुरू करणे. प्रत्येकाला काम मिळविण्याचा हक्क देणे. शेतमजुराला किमान वेतन ठरवून देणे.

९) खासगी उद्योगधंद्यांच्या नफ्यावर नियंत्रण ठेवणे. प्रमुख उद्योगधंद्यांचे राष्ट्रीयकरण करणे. नोकरशाही नष्ट करणे. नोकर वर्गाची नियुक्ती करण्याचा आणि त्यांना परत बोलाविण्याचा हक्क जनतेला देणे.

अशा प्रकारे शेकापने वरील सूत्राच्या आधारे आपल्या राजकारणाची दिशा व साध्ये निश्चित केली. दाभाडी प्रबंधापासून प्रत्येक अधिवेशनातील ठराव आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिस्थितीची चिकित्सा, देशातील चळवळीची अवस्था व त्यातील विविध वर्गाच्या भूमिका अशा प्रश्नांची सूत्रबद्ध मांडणी करण्याचा पायंडा कम्युनिस्ट पक्षाप्रमाणे या पक्षाने स्वीकारलेला दिसून येतो.[१२]

शेकापची वाटचाल:

शेकापच्या पुढारीपणाने आपली राजकीय वाटचाल करताना समविचारी पक्षांची एकजूट करण्याच्या दृष्टीने सुरुवातीपासूनच प्रयत्न केले होते. परंतु त्यात त्यांना यश आले नाही. पक्षात मुख्यत: कम्युनिस्टधार्जिणे, काँग्रेसधार्जिणे आणि स्वतंत्र अस्तित्व मानणारे असे तीन प्रकारची नेते सामील झालेले होते.[१३] या पक्षाचे नेतृत्व शंकरराव मोरे यांच्याकडे होते तरी या पक्षात सर्वश्री केशवराव जेधे, तुळशीदास जाधव, भाऊसाहेब राऊत, नाना पाटील, र. के. खाडिलकर, विठ्ठलराव हांडे, जी. डी. लाड, उद्धवराव पाटील इत्यादी नेते सक्रिय झाले होते. १९५२ च्या निवडणुकीत शेकाप पूर्ण ताकदीने व मोठ्या अपेक्षेने उतरला होता. या निवडणुकीत पक्षाला अपेक्षित यश मिळाले नाही. १९५२ च्या निवडणुकीत पक्षाला जो धक्का बसला तो फारच जबरदस्त होता. पक्षाचे नेते निराश झाले. पराभवाच्या पार्श्वभूमीवर सांगलीला अधिवेशन भरले. ११ जून १९५३ रोजी सांगली येथे भरलेल्या पक्षाच्या अधिवेशनात जनतेने पक्षाला नाकारले आहे त्यामुळे पक्षच मोडीत काढावा असा ठराव सरचिटणीस शंकरराव मोरे यांनी मांडला. परंतु तो फेटाळला गेला.

सांगली अधिवेशनानंतर मोरे शेकापचे कम्युनिस्ट पक्षात विलीनीकरण करावे असा प्रचार करू लागले तर कोल्हापूरचे माधवराव बागल शेकापने पुन्हा काँग्रेसमध्ये जावे असे मत मांडू लागले. तर काहीजण पक्षाचे स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवले पाहिजे असे म्हणू लागले. त्यामुळे पक्षात तीन गट पडले. १९४८ ते १९५४ या काळात पक्षामध्ये फार मोठे वैचारिक संघर्ष झाले, आपापसातील मतभेद वाढले. १९५२ च्या निवडणूक निकालाने निराश झालेल्या ज्येष्ठ नेत्यांमध्ये चलबिचल सुरू झाली. संस्थापकांपैकी भाऊसाहेब राऊत यांचा अपवाद सोडता शंकरराव मोरे, केशवराव जेधे, खाडिलकर आणि तुळशीदास जाधव हे पक्षनेते काँग्रेसमध्ये गेले. पक्षाच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाला. पक्षाचे ज्येष्ठ नेते पक्षाचा त्याग करून निघून गेले तरी पक्षाच्या दुसऱ्या फळीतील नेत्यांनी पक्ष पुढे नेण्याचे ठरविले. यामध्ये उद्धवराव पाटील, अण्णासाहेब गव्हाणे, केशवराव धोंडगे, दाजीबा देसाई, दत्ता पाटील, जी. डी. लाड, प्रा. एन. डी. पाटील, कृष्णराव धुळप, विठ्ठलराव हांडे—पाटील, भगवानराव सूर्यवंशी असे यांचा समावेश होतो. या नेतृत्वाने अनेक जनआंदोलने उभी करून शेकापला नवीन झळाळी आणून दिली.

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

विधिमंडळातील पक्षीय बलाबल पाहता शेकापला कमी—अधिक प्रमाणात जागा मिळत गेल्याचे दिसते. जसे की १९५२ मध्ये विधानसभेच्या १३ जागा, १९५८ मध्ये २८, १९६२ मध्ये १५, १९६७ मध्ये २२, १९९० मध्ये ८, १९९५ मध्ये ७, १९९९ मध्ये ५, २००४ मध्ये २, तर २००९ मध्ये ४, जागा मिळाल्या तर लोकसभेतही काही प्रमाणात जागा मिळाल्या.[१४] असे असले तरी शेकापने आपले ध्येयधोरण डोळ्यासमोर ठेवून सत्तेचा विचार न करता जनतेचा विचार अधिक प्रमाणात केला. त्याचाच एक भाग म्हणून पक्षाकडून अनेक जनआंदोलने करण्यात आली. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत या पक्षाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. १९६२ नंतर 'शेतमालास किफायतशीर भाव द्या' ही मागणी करून आंदोलनात्मक चळवळ सुरू केली. शेकापने राजकीय सत्तेचा विचार न करता जनतेच्या न्याय हक्कासाठी आंदोलने केली. त्यांनी स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्राच्या विकासात्मक वाटचालीत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. पक्षाच्या नेत्यांनी विधीमंडळाच्या कामकाजात अनेक अभ्यासपूर्ण वेगवेगळी आयुधे वापरून सरकारला जेरीस आणले. एवढेच नव्हे तर शेतकऱ्यांच्या प्रश्नाबाबत सरकारला चुकीचे धोरण बदलण्यास भाग सुद्धा पाडले.[१५] उदाहरणार्थ १९७२ मध्ये शेकापच्या दुष्काळ निवारण आंदोलनामुळेच सरकारला रोजगार हमी योजना व कापूस एकाधिकार योजना लागू करावी लागली हे सत्य नाकारता येत नाही. कसेल त्याची जमीन, कमाल जमीन धारणा कायदा, मागेल त्याला काम आणि समान काम समान दाम यास शेकापचा पाठिंबा होता.

निष्कर्ष:

शेतकरी कामगार पक्ष हा शेतकरी व कामगार यांना न्याय व हक्क मिळवून देण्यासाठी स्थापन झालेला होता. लोकशाहीसाठी या दोन घटकांना हक्क मिळवून देणे हे पक्षाने आपले कर्तव्य मानले होते. यास अनुसरून या पक्षाने प्रारंभी मार्क्सवादाचा स्वीकार करून समाजसत्तावादी समाजाचे उद्दिष्ट मान्य केले. त्यानुसार कामगार किसानांचे संघटन करून संसदीय मार्गाचा अवलंब करून जनतेच्या चळवळीला आक्रमकरित्या संघटित करून मतपेटीद्वारा सत्तांतर घडवून आणले. हिंसक प्रतिकार व संसदीय राजकारण न करता व्यवस्थेच्या बाहेर राहून जनसमूहाचे संघटन करणे, जनसमूहांची या चळवळीद्वारा ताकद वाढवून समाजजीवनावर त्यांचे प्रभुत्व निर्माण करणे. या मार्क्सवादावर आधारित वाटचाल करीत असताना या पक्षाने किसान व कामगार यांच्या बाबतीत सुधारणेकडे लक्ष घातले. एवढेच नव्हे तर त्यास अनुसरून आपल्या पक्षाची ध्येयधोरणे ठरविली. पक्षाच्या दाभाडी प्रबंधावर शाहू—फुले विचारांचा गडद प्रभाव होता आणि चीनी साम्यवादी शेतकरी क्रांतीची पार्श्वभूमी होती.[१६] या ध्येयधोरणांची वाटचाल करीत असताना प्रारंभी हा पक्ष राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचा स्पर्धक बनला होता. या पक्षाने प्रारंभी लोकसभा व विधानसभा यांच्या निवडणुकीत आपले उमेदवार उभे करून चांगले यश संपादन केले होते. पण नंतरच्या काळात या पक्षाला आपले स्थान टिकवून ठेवण्यात अपयश आल्याने उत्तरोत्तर हा पक्ष क्षीण होत गेलेला दिसतो.

संदर्भ:

१) मोरे शंकरराव, भारतीय शेतकरी कामगार पक्ष आढावा व आराखडा, प्रकाशक भाई बाबासाहेब देसाई, श्री मुरारी मुद्रणालय, कोल्हापूर, १९८८, पृ. ३
२) फडणीस जगन, शेकाप: शेतकरी कामगार पक्षाचे राजकारण, अजब प्रकाशन, कोल्हापूर, १९७८, पृ. १४
३) मोरे शंकरराव, उपरोक्त, पृ. ७
४) कित्ता, पृ. ८
५) भोळे भास्कर लक्ष्मण, भारतीय शेतकरी कामगार पक्ष जडणघडण व वाटचाल (१९४८ ते १९६०), लोकवाङमय गृह प्रकाशन, २० नोव्हेंबर २०१०, पृ. २३

Impact Factor : 0.4521 (UIF)
ISSN:- 2393-8900

६) मोरे शंकरराव, उपरोक्त, पृ. ९
७) भोळे भास्कर, उपरोक्त, पृ. १९
८) फडणीस जगन, उपरोक्त, पृ. ४३
९) जेधे केशवराव, अध्यक्षीय भाषण, दाभाडी अधिवेशन १९५०, पृ. ३०
१०)भोळे भास्कर, उपरोक्त, पृ. २०
११)भारतीय शेतकरी कामगार पक्ष, राजकीय प्रबंध, दाभाडी अधिवेशन १९५०, पृ. १०
१२)मोरे शंकरराव, उपरोक्त, पृ. १६६
१३)फडणीस जगन, उपरोक्त, पृ. ६०
१४)पळशीकर सुहास व कुलकर्णी सुहास (संपा), महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष — राजकीय पक्षांची वाटचाल, समकालीन प्रकाशन, पुणे, फेब्रुवारी २००७, पृ. १३२
१५) मुलाखत प्रा. एन. डी. पाटील, कोल्हापूर, दि. १२/०२/२०१४
१६) बेडकिहाळ किशोर /पाटील सी. व्ही. (संपा), प्रा. एन. डी. पाटील: व्यक्तित्व आणि कर्तृत्व, प्रकाशक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अकादमी, सातारा, जानेवारी २००५, पृ. ५६